# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महा मेट्रो नागपूरकडून मॉक ड्रिलचे आयोजन

## कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी कर्मचाऱ्यांना तयार ठेवण्याचा उद्देश



नागपूर: मेट्रो कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी नागपूर मेट्रो दर महिन्याला मॉक ड्रिलचे आयोजन करते. या मॉक ड्रिल दिवस आणि रात्रीच्या ((non-revenue)) वेळात घेतल्या जातात. सरासरी दरमहा १० अशा मॉक ड्रिल्स घेतल्या जातात, ज्यामध्ये स्थानक आणि देखभाल विभागाचे कर्मचारी सहभागी होतात.

या ड्रिल्समध्ये आगीवर नियंत्रण मिळवणे, लिफ्टमधून बचाव, आपत्कालीन स्थलांतर, ट्रेन कपलिंगद्वारे बचाव, अडकलेल्या ट्रेनचे बचावकार्य, पुन्हा रुळावर आणणे, तसेच पँटोग्राफ अडकलेल्या ट्रेनचे बचावकार्य अशा विविध आपत्कालीन परिस्थितींचा समावेश असतो. प्रत्येक ड्रिलनंतर, निरीक्षणांसह सविस्तर अहवाल संबंधित विभागाकडे पाठवला जातो, जेणेकरून आवश्यक सुधारणा करून कार्यक्षमतेत सातत्यपूर्ण सुधारणा करता येईल.

महा मेट्रो नागपूरकडून ही मॉक ड्रिल्स सतत आयोजित केल्या जात आहेत, जेणेकरून कोणत्याही वेळेस उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला कर्मचारी तत्परतेने प्रतिसाद देऊ शकतील. मेट्रो स्थानकावर नियुक्त संपूर्ण कर्मचारी वर्ग या मॉक ड्रिलमध्ये सहभागी होतो, ज्यामुळे तयारीचा दर्जा अधिक बळकट होतो. याआधीही अशा अनेक ड्रिल्स घेण्यात आल्या आहेत आणि या प्रकारची प्रक्रिया भविष्यातही सुरूच राहणार आहे.



